Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0004

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

# शिवपूर्वकालीन महाराष्ट्र - एक अध्ययन

अमितकुमार गणेश शिंगणे
संशोधक विद्यार्थी
एम. इ. एस. कॉलेज मेहकर,
जिल्हा बुलढाणा.

**सारांश -**

शिवपूर्वकाळात भारताच्या उत्तरेला मोगल तर दक्षिणेत (महाराष्ट्र) कुतुबुशाही, आदिलशाही, बरीदशाही, इमादशाही या शाह्यांनी आपली सत्ता स्थापन केलेली होती. पश्चिम किनारपट्टीवरील गोव्यात पोर्तुगिजांनी अगोदरच आपली सत्ता स्थापन केली होती. इंग्रच, डच, फ्रेंच यांनी व्यापारी कंपन्याच्या माध्यमातून वखारीच्या स्वरूपात प्रवेश केला होता. अहमदनगर आणि विजापूर हे निजामशाहा आणि आदिलशाहा या दोन सुलतानानी आपसात वाटून घेतले होते. त्यांनी मनाची उदारता न दाखवता प्रजेवर अन्याय, अत्याचार, जुलूम करीत होते. या दोघांचे एकमेकांशी हाडवैर असल्याने त्यांच्यात नेहमी लढाया होत आणि रयतेचे हाल होत त्यामुळे तेथील रयत सुखी नव्हती. उघडपणे सन - उत्सव साजरे करणे, पुजा करणे धोक्याचे झाले होते. रयतेला पोटभर अन्न मिळत नव्हते. राहायला सुरक्षित निवाराही नव्हता. सगळीकडे अन्याय-अत्याचार माजला होता. महाराष्ट्रात ठिकठिकाणी देशमुख, देशपांडे इत्यादी वतनदार होते. पण रयतेकडे त्यांचे लक्ष नव्हते, देशावर प्रेम नव्हते; प्रेम होते ते फक्त वतनावर. या साऱ्या गोष्टीमुळे रयत त्रासून गेली होती. सगळीकडे अंदाधुदी माजली होती. अशा प्रकारे शिवपूर्वकालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक परिस्थिती ही अतिशय रसातळाला गेलेली असल्याने सर्वसामान्य जनतेच्या मनात विद्रोहाची भावना निर्माण होत होती. त्या भावनेला नेतृत्वाची गरज होती जी शिवाजी महाराजांनी पूर्ण करून स्वराज्य निर्मिती केली. त्यामुळे शिवपूर्वकालीन महाराष्ट्र अभ्यासणे महत्त्वाचे ठरते.

Keyword – शिवपूर्वकालीन, महाराष्ट्र, अध्ययन, सत्ता स्थापन

**प्रस्तावना -**

शिवपूर्वकाळात महाराष्ट्रावर इस्लामी सत्ता असून सतत शत्रूच्या राज्याचा प्रदेशावर आक्रमणे होत असत. राज्यकर्ते मुस्लिम आणि बहुसंख्य प्रजा हिंदू यामुळे राज्यकर्त्यांना प्रजेविषयी आणि प्रजेला

राज्यकर्त्यांविषयी आपुलकी वाटत नव्हती. कधी शत्रूचा प्रदेश काबीज करण्यासाठी तर कधी शत्रूच्या प्रदेशातील आर्थिक लूट करण्यासाठी तर कधी शेतीतील उभ्या पिकाचे नुकसान करण्यासाठी जेणे करून शत्रूचे आर्थिक नुकसान होऊन त्यांचे राजकीय वर्चस्व कमी होईल. आर्थिक सुबत्ता नाहीशी झाल्यावर संबधित प्रदेशात राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणे सहज शक्य होऊन राज्य विस्तार करता येईल. राजकीय वर्चस्व वाढविण्यासाठी सर्वसामान्य जनतेचे मात्र सततच्या आक्रमणाने हाल होत होते.

मुस्लीम राजवटीत क्षत्रिय शुद्र बनले, ब्राह्मण, कारकुनी करु लागले. वैश्य वर्ग जवळ-जवळ नष्ट झाला. कडक जातीव्यवस्थेमुळे व अनिष्ट रुढीमुळे हिंदु समाज छिन्न विछिन्न झाला होता. वर्णभेद, जातीभेद, रोटीबंदी, बेटीबंदी आणि अनेक दैवते, अनेक उपासना यामुळे समाजात सर्वत्र विस्कळीतपणा आला होता. मुस्लिमांमधील भांडणे, मराठा सरदारातील आपसातील हेवेदावे, वारंवार होणारे राजकीय बदल, दुष्काळ, जुलूम, स्त्रियांवरील अत्याचार, देवालयांचा विध्वंस यामुळे सामान्य लोकांचे जीवन अतिशय दुःखमय, कष्टमय झाले होते. यामुळे हिंदु समाज मुस्लीमापासून दुरावत जाऊन त्यांच्यात असंतोष पसरला होता. ही सामाजिक परिस्थिती क्रांतीला पोषक होती. मुस्लीम राज्यकर्त्यांचा दृष्टिकोन यामुळे महाराष्ट्रातील लोकांची अस्मिता जागृत होऊन त्यांच्या गुलामगिरीतून सुटका व्हावी असे बहुजन समाजाला वाटू लागले. शिवपूर्व काळात निर्माण झालेली सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक स्थिती ही अतिशय दैननीय होती. सर्वसामान्य जनतेत जगणे असह्य झालेले होते त्याचा स्फोट शिवाजी महाराजांच्या 'हिंदवी स्वराज्याच्या' स्थापनेमुळे झाला. त्यामुळे शिवपूर्वकालीन महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीचा अभ्यास करणे हा सदर शोधनिबंध मानस आहे.

**शिवपूर्वकालीन महाराष्ट्राची सामाजिक स्थिती -**

मध्ययुगीन भारतात महाराष्ट्राची परकीयांच्या आक्रमणापूर्वीची सामाजिक स्थिती चांगली होती. बरेच परकीय भारतीय संस्कृतीशी एकरूप झाले होते. त्यामुळे समाज जीवनाला फारसा धक्का बसला नाही. सर्वसामान्य लोक सुखी व समाधानी होते. दुःष्काळाचे संकट येई आणि राजसत्तेत बदल होत, पण त्याला तोंड देण्याची लोकांमध्ये शक्ती होती. त्यांनतर मात्र अल्लाउद्दीन खिलजींच्या दक्षिणेतील आक्रमणापासून हिंदु समाजावर अनेक प्रकारचे आघात सुरु झाले. ज्यामध्ये मुस्लिमांच्या स्वाऱ्याच्या वेळी मंदिरे, ग्रंथालये, कलाकृती यांची नासधूस केली, लूट केली. असंख्य हिंदु लोकांची हत्त्या केली.

बहुतांश मुस्लिम राज्यकर्ते धर्मवेडे असल्यामुळे हिंदु समाजावर अत्याचार, त्यांच्या मालमत्ता, संपत्ती हिरावून घेणे, जबरदस्तीने धर्मांतर अशा प्रकारचे छळ चालू होते. त्याविरुध्द हिंदुना न्याय मिळेनासा झला. त्यातूनच हिंदु समाजातील लोकांत इस्लामी सत्तेविरुध्द बंडखोरीवृत्ती निर्माण झाली. लुटारु, दरोडेखोर यांच्यापासून हिंदुना संरक्षण नव्हते. दुष्काळ सारख्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी हिंदुना कोणत्याही प्रकारचे साह्य मिळत नव्हते. हिंदुना ते काफिर म्हणून संबोधन करून त्यांच्या स्त्रियांवर, मुलाबाळावरही अन्याय, अत्याचार करीत, गुलामाप्रमाणे वागवीत. हिंदुवर जिझिया, जकाती, हिंदुवानी, पूजाकर, यात्राकर, व्यापारी कर इत्यादी लादून त्यांचे जीवन जगणे मरणासक्त केले होते. म्हणूनच मुस्लीम राजवटीविरुध्द हिंदू जनतेत एकी होवून हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**समाजव्यवस्था -**

भारतीय समाज व्यवस्थेचे प्रमुख अंग म्हणजे जाति. सुरुवातीला वर्णव्यवस्था अस्तित्वात आली. त्यामध्ये ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र असे प्रमुख चार वर्ण होते. हे वर्ण जन्माधिष्ठित होते. व्यक्ती ज्या वर्णात जन्माला आला त्याच वर्णात त्याला राहावे लागत होते. अध्ययन, अध्यापन करणारे ब्राम्हण, राजा व शस्त्र बाळगणारे क्षत्रिय, शेती व व्यापार करणारे वैश्य आणि या तीन वर्णांची सेवा करणारे शुद्र अशी समाजरचना होती. वर्णव्यवस्था जन्माधिष्ठित बनल्यावर त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार बंद झाले. या वर्णव्यवस्थेतून जातिव्यवस्थेचा उदय घडून आला. जातीमध्येही अनेक उपजाती होत्या. प्रत्येक जातीतील लोक आपल्याच जातीपुरते रोटीबेटी व्यवहार करत असत. वर्णव्यवस्था अथवा जातिव्यवस्थेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास जबर शिक्षा देण्यात येत असे.

इ.स.पू. पहिले शतक ते इ.स. पहिले शतक याकाळात वर्णव्यवस्था अधिक कडक स्वरूपात अस्तित्वात आली. याचकाळात मनुस्मृतीचा अंमल मोठ्या प्रमाणात सुरू झाला. ब्राम्हण वर्गाचे वर्चस्व वाढले. प्रत्येक वर्ग अनेक जाती उपजातींमध्ये विभागला गेला. समाज एकजिनसी नसल्यामुळे त्यांना परकीय आक्रमणे रोखता आली नाहीत. परंतु परकीय राजांनीही इथे प्रचलित व्यवस्था स्वीकारल्यामुळे भारतातील जातिव्यवस्थेच्या स्वरूपात फारसा फरक पडला नाही. मध्ययुगीन काळात देशावर मुस्लिम सत्तांची राज्ये होती. पण याकाळातही जातिव्यवस्थेमध्ये फारसा बदल झाला नाही. हीच परिस्थिती शिवकाळात देखील स्वराज्याची घडी सुव्यवस्थित होई पर्यंत कायम होती.

### शिवपूर्वकालीन महाराष्ट्राची राजकीय स्थिती -

प्राचीन काळात भारतात मौर्य, गुप्त, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट या हिंदू राज्य घराण्यांनी साम्राज्ये होती. यानंतर महाराष्ट्रात वाकाटक, कदंब, कलचुरी इत्यादी घराण्यांची लहान, लहान राज्ये स्थापन होऊन वरचेवर राजकीय सत्तेत बदल होत गेले. चालुक्यानंतर उत्तरेतील यादवांनी दक्षिणेत (महाराष्ट्रात ) इ.स. 1127 मध्ये राज्य स्थापन केले. याच काळात भारतावर ग्रीक, शक, कुशाण, हुण या परकीयांनी आक्रमणे केली. त्यानंतर 10 व्या शतकाच्या शेवटी तुर्की, अफगाणी, अरबी यांनी देखील आक्रमणे केली. 11व्या शतकात गझनीचा महंमद यांनी तर त्यांनतर त्याचा मांडलिक महंमद घोरी यांनी देखील आक्रमण करून भारतात इस्लामी राजसत्ता निर्माण केली. 200 वर्षात मुसलमान आक्रमकांनी सर्व उत्तर हिंदुस्थान जिंकला. पुढील 100 वर्षात त्यांनी दक्षिण भारतावर स्वारी करुन दक्षिणेतील यादव, चोल, पांड्य, काकतीय, होयसळ इत्यादी हिंदु राजघराण्यांचा पराभव करुन हिंदू राज्ये जिंकून घेतली. इ.स. 1294 मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीवर स्वारी करुन रामदेवराय यादवांचा पराभव केला. येथूनच मुसलमानांचा दक्षिणेत प्रवेश झाला.

इ.स. 1326 पर्यंत जवळजवळ सर्व हिंदू राज्ये नष्ट झाली आणि सर्व भारत मुस्लिम छत्राखाली आला. महाराष्ट्रातील हिंदू राज्यकर्त्यांची परंपरा खंडित होऊन इस्लामी परंपरेची सुरुवात झाली. राजकीय सत्तेबरोबर इस्लाम धर्माचा प्रसारही सुरु केला. यावेळी इस्लामी राज्यकर्त्यांचे अत्याचार पराकोटीला गेल्याने हिंदुजनता त्रस्त झाली होती. अशा परिस्थितीत दक्षिणेत बहामनी राज्याबरोबर विजयनगर येथे बलाढ्य हिंदू साम्राज्य उदयास आले. हरिहर आणि बुक्क ह्या दोन भावांनी माधवाचार्य विद्याचरण यांच्या प्रेरणेने तुंगभद्रेच्या काठी विजयनगर येथे इ.स. 1336 मध्ये 'हिंदुराज्य' स्थापन केले. यांनी मुसलमानांची आक्रमणे थोपवून त्यांच्या वाढत्या सत्तेला पायबंद घातला. परंतु इ. स. 1564 मध्ये तालीकोटच्या लढाईत विजयनगरचे वैभव संपन्न राज्य नष्ट झाले. विजयनगरच्या हिंदू साम्राज्यामुळे शिवाजी महाराजांला निश्चितच प्रेरणा मिळाली असावी.

इ.स. 1347 मध्ये हसन गंगू याने दक्षिणेत बिदर येथे स्वतंत्र 'बहामनी राज्याची' स्थापना केली. यानंतर खानदेशात थाळनेर येथे अलिखान याने फारुकी घराण्याची सत्ता स्थापन केली; तर बागलाणच्या प्रदेशात राठोड वंशातील एका शूर पुरुषाने आपली सत्ता स्थापन केली. इ.स. 1527 मध्ये बहामनी साम्राज्य नष्ट झाले. बहामनी साम्राज्याचे विघटन होऊन विजापूर येथे आदिलशाही,

अहमदनगर येथे निजामशाही, गोवळकोंडा येथे कुतुबशाही, बिदार येथे बरीदशाही आणि वऱ्हाड मध्ये इमादशाही या पाच शाही राज्यांचा उदय झाला. यापैकी 17 व्या शतकापर्यंत फक्त अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडा ह्या तीनच शाह्या टिकून होत्या ज्यात एकता नव्हती. इ.स. 1526 साली मोगल सरदार बाबर यांने दिल्ली व राजस्थानसह उत्तर प्रदेशात मोगल सत्ता निर्माण केली. अकबराच्या काळात दक्षिण आक्रमणे सुरु झाली. त्यात बिदरची बरीदशाही, खानदेशातील फारुकी सत्ता, त्यानंतर अहमदनगरची निजामशाही नष्ट झाली. मोगलांच्या दक्षिणेवरील स्वाऱ्याच मुख्यतः मराठ्यांच्या उदयास कारणीभूत ठरल्या.

सोळाव्या शतकात पोर्तुगीजांनी गोवा, दिव, दमण, वसई येथे आपल्या वखारी स्थापन करुन राजकीय सत्ता प्रस्थापित केली. कोकणच्या किनारपट्टीने त्यांची संरक्षण व्यवस्था मजबूत केली. त्याबरोबर ख्रिश्चन धर्माचाही प्रसार केला. जंजीरा, राजापूर ही ठाणी सिद्दींनी ताब्यात घेतली. त्याचवेळेस इंग्रजांनी सुरत, मुंबईला वखार स्थापून राजकीय सत्ता सुरु केली. अशा रितीने महाराष्ट्राची कोकण किनारपट्टी युरोपीयनांनी हस्तगत केली. दक्षिणेतील राज्ये उत्तरेतील बलाढ्य मोगल सत्तेचा सामना करू न शकल्याने काळाच्या ओघात नष्ट झाल्या. दक्षिणेतील कमकुवत शाही सत्ताधिशांनी मुलकी व लष्करी खात्यात हिंदुना बरेच अधिकार दिले. गोवळकोंडाच्या कुतुबशहाचा मुख्यप्रधान मुराराराव व अकण्णा, मादण्णा हे सरदार अहमदनगरच्या निजामशहाच्या दरबारी, नंतर आदिलशहाच्या दरबारी शहाजी राजे भोसले आपआपल्या कर्तृत्वाने पुढे आले होते. घाटगे, हरनाईक, जाधव, भोसले, शिंदे, शिर्के, निंबाळकर, महाडीक, मोरे, घोरपडे, माने, देशमुख, देशपांडे, मोहिते, सावंत, गुजर, मामळुक अशा अनेक मराठा घराण्यांनी दक्षिणेतील मुस्लीम राज्यात लष्कर व जमीन महसूल खात्यात चांगला लौकिक मिळविला. या सर्व बाबींचा फायदा मराठी सत्तेच्या उदयास झाला.

### शिवपूर्वकालीन महाराष्ट्राची धार्मिक स्थिती -

उत्तरेतून दक्षिण भारतात मुस्लमानांची आक्रमणे सुरु झाल्यावर महाराष्ट्रातील धार्मिक क्षेत्रात अनेक स्थित्यंतरे घडली. ज्यामध्ये काही मुस्लिम राज्यकर्त्यांचे अपवाद सोडले तर बहुतेक मुस्लिम शासकांच्या काळात हिंदु लोकांची व हिंदु धर्माची स्थिती वाईट होती. गझनी, घोरी, खिलजी, तुघलक या घराण्यातील धर्मांध राजांनी हिंदु विरोधी धोरण स्विकारले तर विजापूरचा मंहमद आदिलशहा व औरंगजेब कट्टर इस्लामचे पुरस्कर्ते असल्याने त्यांनी देखील हेच धोरण कायम ठेवले. त्यांनी हिंदुची

देवळे, देवळातील मूर्ती, मठ, शिलालेख, लेणी, शिल्पकला यांची तोडफोड केली. देवळातील व श्रीमंत लोकांच्या घराण्यातील संपत्तीची लूट करीत अनेक हिंदुना बाटवून मुस्लमान केले, हिंदुच्या बायका भ्रष्ट केल्या, हिंदु स्त्रीयांशी विवाह केले, हिंदुवर अनेक बंधने लादली, साधुसंताचा छळ केला, वैभव संपन्न नगरांचा नाश केला, देवळे पाडून तेथे मशिदी बांधल्या, घाटाचे दर्गे, पर्वतांचे पीर, राऊळांचे महल झाले. ज्यामुळे हिंदु धर्म रसातळाला जायला लागला. या बरोबरच वैदिक धर्मात द्वैती - अद्वैती, कर्ममार्गी - ज्ञानमार्गी, स्मार्त भागवत असे पंथ व उपपंथ निघून वैचारिक गोंधळ निर्माण झाले होते. ब्राह्मण, क्षत्रीय स्वधर्म भ्रष्ट झाले होते. वैश्य वर्ग नाहिसा झाला होता. शुद्र व अतीशुद्र यांनी परधर्म स्विकारला होता. त्यामुळे पूर्वापार चालत आलेले वर्णधर्म, कुळधर्म, जातीधर्म हे सर्व नष्ट होत चालले होते. अशा परिस्थितीत हिंदू लोकात जागृती घडवून आणून हिंदू धर्म जीवंत ठेवण्याचे कार्य त्या काळातील महाराष्ट्रातील साधुसंतांनी, विचारवंतांनी केले.

13व्या शतकाच्या उत्तरार्धात वैदिक धर्माला घरघर लागली होती. समाजाचा ऱ्हास होऊन सांस्कृतिक अध: पतन झाले. तेव्हा हिंदू धर्म व संस्कृतीला वाचविण्यासाठी भारताच्या निरनिराळ्या भागात लोकभाषेतून भक्ती मार्गाचा प्रसार करणारे भागवतधर्मी संत पुढे आले. या कार्यासाठी महाराष्ट्रात प्रथम नाथपंथ, महानुभावपंथ व नंतर वारकरी पंथ हे पुढे आले. अठरापगड जातीतील लोक पुढे येऊन त्यांनी धर्म जागृतीचे व लोक जागृतीचे कार्य केले. त्यामुळे त्यांचा अध्यात्मिक उन्नतीचा परिणाम समाजातील सर्वच जातीवर झाला. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, रामदास या मोठ्या संतांबरोबर वामन पंडीत, मुक्तेश्वर कवी, लेखकांचे कार्य महत्वाचे आहे. त्यांचे स्वरुप सनातनी नसून प्रागतीक होते. माणसाच्या शुध्द अंतकरणाला व भक्तीभावाला त्यांनी महत्त्व दिले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या भक्तीमार्गी चळवळीने महाराष्ट्रीय जनतेत जागृती घडून आली.

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम इत्यादींनी वारकरी संप्रदायातून लोकांच्या मनातील अज्ञान दूर केले. संत एकनाथंनी 'भावार्थ रामायण' या ग्रंथांतून लोकांच्या मनावर स्वराज्याचे महत्त्व वर्णन केले. शिवाजी महाराजांच्या कार्याला पुढे उपयोगी पडलेल्या त्याग, तपस्या, प्रभुत्व, पराक्रम, स्वामीनिष्ठा व धर्मनिष्ठा इत्यादी अलौकित गुणांची ओळख झाली. संतांच्या कार्यामुळेच महाराष्ट्रीय जनतेत एकीची भावना निर्माण झाली. या सर्वांमुळे शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्य निर्मितीसाठी प्रेरणा मिळून स्वराज्याची स्थापना झाली.

**शिवपूर्वकालीन महाराष्ट्राची आर्थिक स्थिती -**

प्राचीन काळापासून ते शिवपूर्व काळापर्यंत महाराष्ट्रात शेती हाच प्रमुख व्यवसाय होता. महाराष्ट्रातील लोक शेतीवर आपला उदरनिर्वाह करीत असत. सर्वात जास्त आणि सर्वात कमी पाऊस पडणारा भूप्रदेश महाराष्ट्रामध्ये असल्याने शेती पावसावरच अवलंबून होती. मध्ययुगीन काळात वारंवार होणाऱ्या परकीय आक्रमणांमुळे महाराष्ट्रातील शेती रसातळाला गेली जाऊन अनेक शेतकरी गावे सोडत असल्याने शेतीबरोबरच गावे उध्वस्त झाली होती. सर्वसामान्य जनतेची राज्यकर्त्यांना पर्वा नव्हती. शेती, शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या परिस्थितीची कुठल्या प्रकारची काळजी नसल्याने त्यांच्या हाल अपेक्षेत जगण्याकडे कुणाचे लक्ष नव्हते. राजकोषात वेळेवर कर जमा होतो की नाही यावर सर्व लक्ष केंद्रित होते. स्वतःचे राज्य कशाप्रकारे वाढवता येईल, जास्तीत जास्त प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली कशाप्रकारे आणता येईल, राजकोषात कशा प्रकारे भर पडेल, राज्याची आर्थिक सुबत्ता कशाप्रकारे वाढेल याकडेच तत्कालीन राजांचे लक्ष असल्यामुळे "राजा श्रीमंत आणि प्रजा दरिद्री" अशी अवस्था निर्माण झाल्याने सर्वसामान्य जनतेची आर्थिक परिस्थिती अतिशय दैननिय, हलाखीची झालेली होती.

14 व्या शतकाच्या सुरुवातीस अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेवर स्वाऱ्या करुन महाराष्ट्रातून अमाप लूट नेली तेव्हापासून ते स्वराज्य निर्मितीपर्यंतची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट होती. येथील जनतेला राजकीय स्वातंत्र्य तर गमविले शिवाय आर्थिक गुलामगिरी पत्करावी लागली. मुस्लीम शासकांनी प्रजेवर अन्यायी कर बसविले. त्यामुळे येणाऱ्या उत्पन्नातून दैनंदिन जीवन जगणे अत्यंत कष्टदायक झाले. परकियांच्या व्यापारी धोरणामुळे लघु, कुटीर उद्योगधंदेही बुडाले यात वारंवार पडणारा दुःष्काळ यामुळे जनता त्रस्त झाली. आर्थिक दैनावस्था झाल्यामुळे त्रस्त झालेल्या जनतेने जुलमी मुस्लीम सत्तेविरुध्द हिंदवी स्वराज्य स्थापनेत शिवाजी महाराजांना पूर्णपणे पाठिंबा दिला.

वरीलप्रमाणे महाराष्ट्राची सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक परिस्थिती होती. या परिस्थितीत शिवाजी महाराजांच्या नेतृत्वात हिंदवी स्वराज्य स्थापन झाले.

**निष्कर्ष -**

1. शिवपूर्वकाळात महाराष्ट्रामध्ये सर्वत्र अराजकता माजलेली असून सर्वसामान्य जनतेचे हाल - हाल होत होते.

https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0004
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

2. सततचे आक्रमणे, राज्यकर्त्यांनी लादलेला कराचा बोजा सोबतच नैसर्गिक संकटाच्या वेळी न मिळणारी राजकीय मदत यामुळे सर्व सामान्य जनता उपेक्षित जीवन जगत होती.
3. शिवाजी महाराजांमध्ये असलेले नेतृत्व कौशल्य आणि कर्तृत्व यामुळे मराठेशाही म्हणजेच स्वराज्य निर्माण होऊ शकले. त्यांच्यामध्ये राजकारणी, मुसद्दी, धोरणी, साहसी, उत्तम संघटक, न्यायी व स्वतंत्र वृत्ती होती.
4. शिवाजी महाराजांनी सर्व मराठ्यांचा स्वाभिमान जागृत करून जनतेतील निराशा नाहिशी करुन त्यांना नवी दिशा दाखवून देशात नवचैतन्य निर्माण केले.
5. शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रीय लोकांच्या ठिकाणी असलेल्या सुप्त गुणांना विकासाची संधी मिळवून दिली. मराठा सरदारांना व विविध जाती-जमातीच्या सामान्य लोकांना संघटित करुन त्यांच्या कर्तव्याची जाणीव करुन देऊन त्यांना स्वराज्य स्थापनेच्या कार्यास वाहून घेतले. ज्यामुळे स्वराज्य स्थापन होऊ शकले.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

1. आचार्य, धनंजय - मराठा सत्तेचा उदय, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2007.
2. कुलकर्णी अ.रा - शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 1993.
3. गाठाळ, एस.एस. - मराठ्यांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 2019.
4. दांडेकर, गोपाळ निळकंठ - महाराष्ट्र दर्शन, मृण्मयी प्रकाशन, पुणे, 2001.
5. पवार, जयसिंगराव - मराठी सत्तेचा उदय, पृथ्वी पब्लिकेशन, कोल्हापूर, 2010.
6. रडे, प्रा. का.रा.; चौधरी, प्रा. श्रेया - मराठी सत्तेचा उदय (इ.स. 1630-1707), प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2013.